# गहू, हरभरा, मसूरच्या हमीभावात वाढ





| रब्बीसाठीची हमीभाव वाढ (प्रति क्विंटल) | | | |
|---|---|---|---|
| धान्य | गेल्या वर्षीचे दर (२०१७-१८) | वाढ (रु) | नवे हमीभाव (रुपये) (२०१८-१९) |
| गहू | १७३५ | १०५ | १८४० |
| मसूर | ४२५० | २२५ | ४४७५ |
| हरभरा | ४४०० | २२० | ४६२० |
| जवस | १४१० | ३० | १४४० |
| करडई | ४१०० | ८४५ | ४९४५ |
| मोहरी | ४००० | २०० | ४२०० |

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने २०१८-१९ मधील रब्बी हंगामासाठी गव्हासह काही पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय बुधवारी (ता. ३) घेतला.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या या निर्णयानुसार गव्हाची किमान आधारभूत किंमत प्रतिक्विंटल १०५ रुपयांनी वाढवून ती १८४० रुपये क्विंटल करण्यात आली आहे. केंद्राने गेल्या वर्षी गव्हासाठी प्रतिक्विंटल १७३५ रुपये 'एमएसपी' जाहीर केली होती. बुधवारी घेतलेल्या निर्णयानुसार त्यात १०५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. कृषी सल्लागार समितीने (सीएसीपी) याबाबतची शिफारस केली होती. पिकाच्या उत्पादन खर्चाच्या ५० टक्के जास्त भाव शेतकऱ्यांना देण्याचे सरकारचे आश्वासन आहे. नव्या एमएसपी वाढीमुळे शेतकऱ्यांना ६३ हजार ६३५ कोटी रुपयांचा फायदा होईल व उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा होईल, असे केंद्रीय मंत्री राधामोहन सिंह व रविशंकर प्रसाद यांनी पत्रकारांना सांगितले.

**मसूर, हरभऱ्यातही वाढ**

अन्य काही पिकांसाठीही प्रतिक्विंटल एमएसपीमध्ये वाढ करण्यात आली. ती अशी : मसूर-२२५ रुपये, करडई-८४५ रुपये आणि हरभरा-२२० रुपये. या वाढीमुळे या तिन्ही पिकांसाठी शेतकऱ्यांना अनुक्रमे ४४७५ रुपये, ४९४५ रुपये व ४६२० रुपये असा प्रतिक्विंटल भाव मिळेल. याशिवाय जवसाची एमएसपी क्विंटलमागे ३० रुपयांनी वाढवून १४४० रुपये करण्यात आली आहे.

**'हमीभावातील भाव तुटपुंजी'**

केंद्र सरकारने रब्बी हंगामासाठी किमान आधारभूत दर जाहीर केले आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा दृष्टीने ही वाढ करण्यात आल्याचा दावा सरकारने केला आहे. प्रत्यक्षात मात्र शेतीमालाच्या उत्पादन खर्चात झालेली वाढ पाहता करण्यात आलेली ही वाढ अत्यंत तुटपुंजी आहे. महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी हमीभावासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर दिल्लीच्या सीमेवर अमानुष लाठीचार्ज करण्यात आला. लाठीचार्जच्या जखमांवर रास्त हमीभाव जाहीर करून मलम लावण्याऐवजी हमीभावात अत्यल्प वाढ करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले आहे. सरकारच्या महागाई वाढविणाऱ्या धोरणांमुळे शेतीमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. पेट्रोल डिझेलचे भाव शंभरीकडे वाटचाल करत आहेत. बियाणे, खते, कीटकनाशके यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. राज्यात पावसाने पाठ फिरविल्यामुळे पिकांचे उत्पन्न घटणार आहे. परिणामी उत्पादन खर्चात आणखी वाढ होत आहे. अशा पार्श्वभूमीवर सरकारने किमान आधारभूत किमतीत अत्यंत तुटपुंजी वाढ केली आहे. वाढीव उत्पादन खर्च व घटणारे उत्पादन याचा विचार करता रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत रास्त वाढ करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

## राज्यात पेट्रोल पाच रुपयांनी स्वस्त

**मुंबई :** केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलच्या दरांमध्ये अडीच रुपयांची कपात घोषित केल्यानंतर महाराष्ट्रानेही पेट्रोलच्या दरांमध्ये अडीच रुपयांची कपात केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यामुळे राज्यातील पेट्रोल लिटरमागे ५ रुपयांनी स्वस्त झाले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) वाढत्या किमतींचा परिणाम म्हणून जगभरात इंधन दरांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. देशांतर्गत याचा प्रतिकूल परिणाम होऊन जनतेला त्याची झळ बसू नये म्हणून केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलच्या दरांमध्ये लिटरमागे प्रत्येकी अडीच रुपयांची कपात केल्याची घोषणा केंद्रीय वित्तमंत्री अरुण जेटली यांनी केली. तसेच, राज्यांनीही या निर्णयाला प्रतिसाद म्हणून इंधनाच्या दरांमध्ये कपात करण्यासाठी आपला वाटा म्हणून इंधनावरील मूल्यवर्धित करामध्ये (व्हॅट) अडीच रुपयांची कपात करावी, असे आवाहनही श्री. जेटली यांनी केले आहे. या आवाहनाला तातडीने प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रामध्ये पेट्रोलच्या दरामध्ये अडीच रुपयांची कपात केल्याची घोषणा केली आहे.

## 'नाफेड'चा साडेतेरा हजार टन कांदा जातोय दिल्ली, भुवनेश्वरला

**नाशिक (प्रतिनिधी) :** कांदा दरात स्थिरता यावी यासाठी नाफेडने एप्रिल ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत खरेदी केलेला १३ हजार ५०० मेट्रिक टन कांदा आता आठ ते दहा दिवसांपासून दिल्ली, आझादनगर, भुवनेश्वर या ठिकाणी

पाठवण्यात येत असल्याची माहिती 'नाफेड'चे संचालक नानासाहेब पाटील यांनी दिली. सहा महिन्यांपासून हा कांदा खरेदी होत आहे. त्यामध्ये दररोज होणाऱ्या वातावरणाच्या बदलामुळे १५ ते २० टक्क्यांपर्यंत घट आणि नुकसान होत आहे. ज्या वेळी संपूर्ण चाळीमधून कांदा बाहेर काढण्यात येईल त्या वेळीच नुकसानीची आकडेवारी समोर येईल, असेही पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

कांदादरात चढ-उतार झाल्यानंतर दर समतोल ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने नाफेडमार्फत कांदा स्थिरीकरण फंड अंतर्गत कांदा खरेदी दरवर्षी करण्यात येते.

या वर्षी २५ हजार मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट होते. त्यानुसार नाफेडने साडेतेरा हजार मेट्रिक टन कांदा खरेदी केला होता. तो आता विविध राज्यांत नाफेड तसेच इतर यंत्रणांमार्फत पाठवला जात आहे.

> कांद्याचे घसरते दर आटोक्यात राहावे व ग्राहकांना योग्य दरात कांदा उपलब्ध व्हावा, या हेतूने तसेच कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने नाफेडमार्फत किंमत स्थिरीकरण निधीच्या माध्यमातून २५ हजार मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यात आतापर्यंत तब्बल १३ कोटी रुपये खर्च करून १३ हजार ५०० मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला आहे. शेतीमालाच्या दरातील घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने डॉ. स्वामिनाथन आयोगाने सुचविलेल्या भाव स्थिरीकरण निधी योजनेसाठी मोठी आर्थिक तरतूद केली. त्यातून या वर्षी २५ हजार मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट आहे. घाऊक बाजारात भाव घसरू नयेत म्हणून नाशिक, नगर, पुणे जिल्ह्यांतील बाजार समित्यांमधून नाफेडने हा कांदा खरेदी केला आहे. केंद्र सरकारने नाफेडमार्फत खरेदी केलेला कांदा रवाना करण्यासाठी चाळीतून बाहेर काढला जात आहे. यातील वजनातील घट व हवामानाचा परिणाम यामुळे कांदा किती खराब निघतो हे लवकरच समजेल.
>
> **- नानासाहेब पाटील**, संचालक, नाफेड.

## 'एसीबी'ने शोधला 'जलयुक्त'मध्ये घोटाळा

▸ पान १ वरून

सर्व तालुक्यांची चौकशी केल्यास २५ कोटींच्या आसपास गैरव्यवहार आढळू शकतो, असे सूत्रांचे म्हणणे आहे. "आम्हाला तक्रारींमध्ये तथ्य आढळले आहे. मात्र, सखोल चौकशीला कृषी आयुक्तालयाने अजूनही मान्यता दिलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांनी आदेश दिल्याशिवाय या प्रकरणात आम्हाला पुढे जाता येणार नाही. महासंचालक देखील कृषी आयुक्तांच्या मान्यतेशिवाय कोणतीही भूमिका घेणार नाहीत," असे लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या विभागातून सांगण्यात आले.

घोटाळ्याची फाईल आयुक्तांच्या नजरेला पडू न देण्याची पद्धतशीरपणे काळजी घेण्यात आली आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे मृद संधारण विभागाचे अवर सचिव सु.द. नाईक यांनी कृषी आयुक्तालयातील मृद संधारण संचालकांना पत्र लिहून या प्रकरणी गृह विभागाला उघड चौकशी देण्याबाबत आपला अभिप्राय कळविण्याची सूचना केली होती.

**संचालकांनी अहवाल पाठविला नाही**

"गृह विभागाला या प्रकरणाची पुढील चौकशी करण्यासाठी मान्यता देण्याबाबत मृदसंधारण संचालकांनी त्यांचे मत कृषी आयुक्तांच्या संमतीने आमच्याकडे पाठविणे आवश्यक होते. मात्र, संचालकांनी कोणताही अहवाल पाठविला नाही. मधल्या काळात मूळ संचालकावरच पोलिसांनी दुसऱ्या एका घोटाळ्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, घोटाळ्याची फाईल मंत्रालयात मागविण्यात आलेली नसून आयुक्तालयातच कागदपत्रे असावीत, अशी माहिती मृदसंधारण सचिवालयाच्या सूत्रांनी दिली.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
ज्योती अॅग्रो सर्व्हिसेस
दाळिंब, ता. उमरगा
प्रायोजित
अॅग्रोवन संवाद
'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
शनिवार, ६ ऑक्टोबर २०१८
विषय : द्राक्ष पीक व्यवस्थापन
वक्ते : श्री. विशाल मिरजे (द्राक्षतज्ज्ञ, वनिता अॅग्रो केम (इं) प्रा. लि.)
श्री. एस. एन. जाधव (तालुका कृषी अधिकारी, उमरगा)
श्री. अविनाश अंबुरे (पं.स. तालुका कृषी अधिकारी, उमरगा)
स्थळ : महादेव मंदिर, दाळिंब,
ता. उमरगा, जि. उस्मानाबाद,
वेळ : सकाळी १० वाजता
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.